नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026






सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# कुंभमेळा विकासकामांमुळे नाशिक-त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार : मुख्यमंत्री

## विविध विकासकामांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पाहणी

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात सुरू असलेली विविध विकासकामे वेगाने पूर्णत्वाकडे जात असून, या कामांमुळे नाशिक व त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच भाविक, पर्यटक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेली सर्व कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्रंबकेश्वर दौरा मध्ये व्यक्त केला.

सिंहस्थ महा कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण संमारंभाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी काल त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट तसेच नाशिक येथील द्वारका सर्कल तसेच ओझर विमानतळ येथे भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती घेतली. यावेळी कामांची गती वाढवून ती वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



यावेळी पालकमंत्री गिरीश महाजन, जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव तथा पालक सचिव एकनाथ डवले, आमदार हिरामण खोसकर, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. एस. व्ही. स्वामी, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, एमएसआयडीसीचे अधिकारी ब्रिजेश दीक्षित उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, तहसीलदार गणेश जाधव, मुख्याधिकारी गोविंद जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने सुरू असलेली कामे केवळ कुंभमेळ्यापुरती मर्यादित नसून, पुढील २५ ते ३० वर्षांसाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाचा पाया मजबूत करणारी आहेत. आधुनिक शहराच्या दिशेने वाटचाल करताना वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा, भाविक व पर्यटकांसाठी सुविधा तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ही कामे परिवर्तनात्मक ठरणार आहेत. पुढील टप्प्यात विमानतळाशी संबंधित विकासकामांनाही गती मिळणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभाग आणि यंत्रणा समन्वयाने काम करीत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले. त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट परिसरातील कामे आव्हानात्मक असली तरी ती नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, परिसराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

### समन्वयातून विकास

महानगरपालिका, एमएसआरडीसी, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच विविध संबंधित विभागांच्या समन्वयातून ही कामे सुरू आहेत. पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा समन्वय तसेच सर्व यंत्रणांची एकत्रित टीम म्हणून सुरू असलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. या विकासकामांना गती देणाऱ्या सर्व यंत्रणांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले. विशेषतः एमएसआरडीसीने हाती घेतलेल्या महत्त्वपूर्ण कामांचे त्यांनी कौतुक केले.

# तुकाराम मुंढे होणार MPSCच्या चौकशी आयोगाचे नवे सचिव

पुणे : (स. गांवकरी)

पुणे येथे एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु आहे. एमपीएससीच्या अध्यक्षांना हटवण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन केले जात असून मंत्री शिवेंद्रराजे यांनी मोठी घोषणा केली आहे. तुकाराम मुंढे एमपीसीच्या चौकशी आयोगाचे आयोगाचे सचिव म्हणून काम पाहणार आहे, अशी घोषणा राज्य सरकारच्या वतीने शिवेंद्रराजे भोसले यांनी केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात मागील ११ दिवसांपासून एमपीएससी संदर्भात विद्यार्थ्यांकडून आंदोलनं केली जात आहेत. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीममवार यांचा राजीनामा घ्यावा, अशी प्रमुख मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. ११ दिवसांपासून सुरु असलेलं हे आंदोलन विद्यार्थ्यांनी मागे घेण्यासाठी मंत्री शिवेंद्रराजे यांनी आंदोलकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी 'अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे आता MPSC चौकशी आयोगाचे सचिव म्हणून काम पाहणार' अशी मोठी घोषणा केली. शिवेंद्र राजे यांच्या या घोषणेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यात एमपीएससी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली असता भीमनरावांच्या राजीनाम्याची मागणी सरकारकडून अमान्य करण्यात आली आहे, असेही सांगितले. शिवेंद्रराजे यांनी सरकारचा मसुदा रोहित पवार यांच्या हाती सोपवला. यावेळी रोहित पवार यांनी सरकारचा हा मसुदा विद्यार्थ्यांना वाचून दाखवला असता, त्यामध्ये अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याविषयी उल्लेख नसल्याचे दिसून आहे. त्यामुळे विवेक भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी रोहित पवारांनी यावेळी केली.

### विद्यार्थ्यांवरील गुन्हे रद्द

पुण्यात करण्यात आलेल्या आंदोलनात पोलिसांनी कारवाई करत अनेक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले होते. मात्र विद्यार्थ्यांवरील ते सर्व गुन्हे मागे घेण्याची घोषणा शिवेंद्रराजे यांनी यावेळी केली. तसेच एमपीएससी संदर्भात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे देखील सांगितले. त्याचबरोबर येणाऱ्या काळात गट क पदांसाठी परीक्षा होणार असून त्याच्या संख्येमध्ये वाढ होणार असल्याचेही म्हटले.

## थोडक्यात...

### शेतकऱ्याची तलावात उडी घेऊन आत्महत्या

चंद्रपूर (स. गांवकरी) : पावसाअभावी धान पीक हातचे गेल्याने कर्जबाजारी झालेल्या नागभीड तालुक्यातील मींथुर येथील ६५ वर्षीय शेतकरी मुखरू लक्ष्मण दडमल यांनी रविवारी (११ ऑक्टोबर) गावातील तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. सकाळी सुमारे ८ वाजता ते तलावाकडे गेल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या पत्नीने त्यांच्यावर मायक्रो फायनान्सचे कर्ज असल्याची माहिती दिली. यंदा पावसाअभावी संपूर्ण धान पीक उद्ध्वस्त झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या विवंचनेत ते होते. शासनाने दुष्काळ जाहीर केला असला तरी मदत किती आणि कधी मिळणार, याबाबतही चिंता होती. घटनेची माहिती मिळताच नागभीड पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. ठाणेदार कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १० वाजल्यापासून तलावात शोध घेण्यात येत आहे. वृत्त लिहिपर्यंत दडमल यांचा शोध लागला नव्हता.

### एका भारतीय नागरिकाचा मृत्यू

मुंबई (स. गांवकरी) : सौदी अरेबियाच्या रियाध येथील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या भीषण हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून १० हून अधिक भारतीय जखमी झाले आहेत. या हल्ल्यात तब्बल १२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ३०० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. या जखमींमध्ये ११ भारतीय नागरिकांचा समावेश असल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर सौदीतील भारतीय दूतावास सतर्क झाला असून जखमींच्या प्रकृतीवर आणि स्थानिक प्रशासनाच्या कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. या संदर्भातील वृत्त PTI या वृत्तसंस्थेने दिले आहे. रियाध विमानतळावर झालेल्या या भ्याड हल्ल्याचा भारतीय दूतावासाने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. दूतावासाने सोशल मीडियाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच भारतीय अधिकाऱ्यांनी तत्काळ स्थानिक प्रशासन आणि रुग्णालय व्यवस्थापनाशी संपर्क साधला. जखमी झालेल्या सर्व भारतीय नागरिकांना योग्य ते वैद्यकीय उपचार मिळतील याची खात्री केली जात असून, दूतावास त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सतत संपर्कात आहे. सौदी अरेबियातील विमानतळाला लक्ष्य करून करण्यात आलेला हा गेल्या आठवड्यातील तिसरा मोठा हल्ला आहे.

# सर्वोच्च न्यायालयावर आज विरोधकांचा मोर्चा

## नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

'मतचोरी'च्या मुद्द्यावरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र करत विरोधी पक्ष सोमवारी सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणार आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी भेटीसाठी सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्याकडे वेळ मागितली होती. मात्र ती नाकारण्यात आली. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीला (एसआयआर) स्थगिती द्यावी, मतदानासाठी पुन्हा मतपत्रिकांचा वापर सुरू करावा आणि कथित मतचोरी थांबवावी, अशा मागण्यांचे निवेदन सरन्यायाधीशांना देण्यात येणार होते. राहुल गांधी आणि खरगे यांनी सोमवारी सायंकाळी चार ते पाच या वेळेत भेट मिळावी, यासाठी सरन्यायाधीशांना पत्र लिहिले आहे. देशातील जनतेच्या वतीने हे निवेदन सादर केले जाणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. युवक, सर्व विरोधी पक्ष, नागरी संघटना आणि संविधानावर विश्वास असलेले नागरिक या मोर्चात सहभागी होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसने या आंदोलनाला 'चलो दिल्ली-लोकशाहीसाठी मोर्चा' असे नाव दिले आहे. सोमवारी दुपारी दीड वाजता कॅनॉट प्लेस-बडाखंबा रोड चौकात जमण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> भारतीय म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढणार आहोत. पक्ष, स्त्री-पुरुष, जात, समुदाय आणि राज्यांच्या भिंती ओलांडून आपण सर्वजण एकत्र चालणार आहोत. देशाच्या वतीने आम्ही सरन्यायाधीशांना निवेदन सादर करणार आहोत.
>
> – राहुल गांधी, विरोधी पक्षनेते

'लोकशाहीसाठी एकत्र चालू'

'शनिवारी देशातील युवक शांततेने आंदोलन करण्यासाठी दिल्लीत आले होते. त्यांच्या मनात द्वेष किंवा राग नव्हता, तर प्रेम होते. मात्र, पोलिस आणि भाजपच्या गुंडांनी त्यांना मारहाण केली. आपल्याला असा



भारत नको आहे,' असे राहुल गांधी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे भारताचा आवाज दाबू शकणार नाहीत, असा दावाही त्यांनी केला. 'आम्ही प्रेम, बंधुभाव आणि देशभक्तीच्या भावनेने एकत्र मोर्चा काढू. घाबरू नका,' असे आवाहनही त्यांनी केले. खरगे यांनी बंगळुरू येथे पत्रकारांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यामुळे देशभरात अराजकता निर्माण झाल्याचा आरोप केला. शनिवारी दिल्लीतील आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करणे आणि आंदोलकांना ताब्यात घेणे, यातून युवकांच्या आंदोलनाची सरकारला भीती वाटत असल्याचे दिसते, असे ते म्हणाले.

# डिजिटल मुंबई सायबर गुन्ह्यांच्या जाळ्यात

मुंबई : (स. गांवकरी)

भूलथापा देऊन बँकेचा तपशील मिळवून पैसे हडप करणे, डिजिटल अॅरेस्टची भीती दाखवून डल्ला, ऑनलाइन खरेदीत गंडा, विवाह जुळणी संकेतस्थळावर खोटे तपशील देऊन फसवणूक, चुकीची लिंक पाठवून मोबाइल हॅक करणे... अशा प्रकारच्या अनेक सायबर गुन्ह्याचे प्रमाण मुंबईत वाढले आहे.




मुंबई पोलीस दलाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, जानेवारी ते ऑगस्ट या अवघ्या आठ महिन्यांत मुंबईत ४,२५४ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. मात्र या गुन्ह्यांपैकी केवळ १८२ प्रकरणांची उकल करण्यात तपास यंत्रणांना यश आले आहे. मुंबई पोलिसांच्या आकडेवारीचे विश्लेषण केले असता, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि बँक फसवणुकीशी संबंधित १,०२० गुन्हे या आठ महिन्यांत दाखल झाले आहेत.

# पुण्यातील विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

## 'एमपीएससी' अध्यक्ष विवेक भीमनवार सक्तीच्या रजेवर

पुणे : (स. गांवकरी)

चौकशी होईपर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष विवेक भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रविवारी रात्री दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनीही तत्वतः हे आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर केले. 'एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रविवारी सायंकाळी उशिरा भेट देऊन सरकारची भूमिका स्पष्ट केली. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांचा तपास करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी आयोगाची स्थापना



करण्यात येणार असून, आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांची, तर सचिवपदी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे,' अशी घोषणाही त्यांनी केली.

समितीच्या चौकशीची व्याप्ती केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित न ठेवता पेपरफुटी झालेल्या सर्व परीक्षांचा समावेश करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्याकडील पुरावे समितीसमोर सादर करता येणार असल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पेपरफुटीच्या प्रकरणांचा तपास करण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली असून, आयोगाच्या अध्यक्षपदी माजी मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांची नियुक्ती केली आहे. सचिवपदी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासह माजी न्यायाधीश पी. डी. नाईक, पोलीस महानिरीक्षक लखमी गौतम, सेवानिवृत्त अधिकारी गणेश पाटील यांचा या समितीत समावेश आहे.

"एमपीएससी पेपरफूट प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीची घोषणा केली आहे. मी माझ्या संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला कायम प्राधान्य दिले. त्यामुळे ही चौकशी पूर्ण होईस्तोवर पदावर कार्यरत न राहता या कालावधीत रजेवर जाण्याचा निर्णय मी घेतला आहे. 'एमपीएससी'ची स्वायत्तता, विश्वसनीयता आणि विद्यार्थीहिताला कायम माझे प्राधान्य होते आणि यापुढेही असेल,' अशी प्रतिक्रिया आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी समाजमाध्यमांवर दिली.




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# दुसऱ्याला अवहेलनेची सल...

**फुटबॉलच्या इतिहासात काही कथा जिंकलेल्या सामन्यांपेक्षा मोठ्या असतात. लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो या दोन खेळाडूंच्या कथा अशा आहेत. दोन दशके फुटबॉलच्या आकाशात हे दोन ध्रुवतारे एकमेकांच्या प्रकाशाला आव्हान देत राहिले. कोण महान, कोणाची आकडेवारी सरस, या प्रश्नांनी फुटबॉलविश्वाची पाने भरली, पण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीच्या अखेरच्या वळणावर उभे राहिल्यावर एक वेगळाच प्रश्न समोर येतो- महानतेचा शेवटही महानतेइतकाच सुंदर असतो का? मेस्सीच्या बाबतीत उत्तर 'होय' आहे. रोनाल्डोच्या बाबतीत मात्र नियतीने जणू वेगळेच उत्तर लिहिले आहे.**

ब्युनोस आयर्सच्या मैदानावर ८५ हजारांहून अधिक चाहत्यांसमोर मेस्सीने बेनिनविरुद्ध एक गोल केला, दोन गोलसाठी साहाय्य केले आणि अर्जेंटिनाला ३-० विजय मिळवून दिला. मैदानावर 'ग्रासियास'चा संदेश, चाहत्यांचे अश्रू, जल्लोष व कृतज्ञतेने भरलेले वातावरण हा निरोप नव्हता तर ती एका देशाने आपल्या नायकाला दिलेली सामूहिक मिठी होती. कदाचित मेस्सी या क्षणाचा हकदार होता. मॅराडोनाच्या सावलीत उभ्या असलेल्या या विलक्षण प्रतिभेला आपल्या देशाच्या अपेक्षांचे ओझे वाहावे लागले. २०१४चे विश्वचषक अंतिम सामन्यातील अश्रू, २०१५ आणि २०१६च्या कोपा अमेरिका अंतिम सामन्यांतील अपयश आणि त्यानंतर घेतलेला निवृत्तीचा निर्णय. पण काही नाती तुटण्यासाठी नसतात, ती परीक्षा घेण्यासाठी असतात. मेस्सी परतला आणि मग नियतीने जणू त्याच्यासाठी राखून ठेवलेली पाने एकामागून एक उलगडत गेली. २०२१ची कोपा अमेरिका, २०२२ची विश्वचषक विजयाची स्वप्नपूर्ती आणि त्यानंतर २०२४ची कोपा अमेरिका. ज्याला आयुष्यभर अपूर्ण म्हणत आले, त्याच मेस्सीच्या हातात अखेर सगळ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आल्या; म्हणून मेस्सीचा निरोप सुंदर होता. पण, त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो पूर्ण होता.

त्याच वेळी हजारो किलोमीटर दूर, पोर्तुगालच्या कथेत मात्र वेगळीच शांतता होती. ख्रिस्तियानो रोनाल्डो, ज्याने पोर्तुगालला आपल्या खांद्यावर उचलून नेले, देशाला युरोपीय विजेतेपद मिळवून दिले आणि दोन नेशन्स लीग जेतेपदांपर्यंत पोहोचवले, त्याच रोनाल्डोच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीच्या अखेरीस मात्र गौरवापेक्षा वादाचे सावट अधिक दिसत आहे. नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात तो बाकावर राहिला. त्यानंतर डेन्मार्कविरुद्धच्या सामन्यातही सुरुवातीच्या संघात स्थान मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले. त्यातून निर्माण झालेल्या वादानंतर त्याने पोर्तुगालचे प्रशिक्षण शिबिर सोडले. पुढे रोनाल्डोने प्रशिक्षक जॉर्ज जिझस यांच्यावर विश्वासभंगाचा आरोप केला. मात्र, त्याच वेळी आपल्या कृतीची जबाबदारी स्वीकारून पोर्तुगीज फुटबॉल महासंघाने आपल्याला शिक्षा करावी, असेही त्याने म्हटले. हीच गोष्ट या संपूर्ण प्रसंगाला अधिक वेदनादायी बनवते. कारण, रोनाल्डोने अद्याप आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतलेलीही नाही. तो अजून पोर्तुगालसाठी खेळू इच्छितो. पण, प्रश्न हा नाही की, तो अजून किती खेळू शकतो. प्रश्न हा आहे की, ज्या माणसाने पोर्तुगालला इतके काही दिले, त्याला शेवटच्या वेळी पोर्तुगालने काय दिले? कदाचित याच ठिकाणी नियतीचा न्याय आणि नियतीची क्रूरता एकाच वेळी दिसते. मेस्सी आणि रोनाल्डोची तुलना करताना आपण नेहमी आकडे मोजले, गोल मोजले, बॅलन डी'ओर मोजले, ट्रॉफी मोजल्या, विक्रम मोजले; पण त्यांच्या शेवटाकडे पाहताना आकडे अचानक निरर्थक वाटतात. दोघांनीही आपल्या देशासाठी सर्वस्व दिले. दोघांनीही पराभव पाहिले. दोघांनीही आपल्या राष्ट्राच्या अपेक्षांचे ओझे खांद्यावर घेतले. मग शेवट असा वेगळा का? नियतीला समानता माहीत असतेच असे नाही. मेस्सीच्या कथेत नियतीने उशिरा का होईना, पण हिशेब चुकता केला. त्याने अखेरीस इतके जिंकले की, त्याच्याकडे मागे वळून पाहताना अपूर्णतेसाठी जागाच उरली नाही. ही नियतीची वर्तुळाकार रचना होती. रोनाल्डोची कहाणी मात्र वेगळी आहे. कदाचित अधिक शोकात्म. पोर्तुगालच्या फुटबॉलला त्याने जे दिले, त्याची तुलना केवळ आकडेवारीत करता येणार नाही. त्याने एका देशाला आम्हीही जिंकू शकतो हा विश्वास दिला. पण, कदाचित त्याच्या कथेला अजूनही एक शेवट हवा आहे. हजारो चाहत्यांचा आवाज आणि त्या आवाजात एकच वाक्य- ओब्रिगाडो... ख्रिस्तियानो. पण, सध्या पोर्तुगाल आणि रोनाल्डो यांच्यात शब्दांपेक्षा गैरसमज उभे राहिले आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे



## दिव्याची आई माऊली' चं भव्य आगमन सोहळा दिमाखात

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : आदर्श मित्र मंडळाच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सवानिमित्त नवसाला पावणारी 'दिव्याची आई माऊली' हिचा भव्य आगमन सोहळा रविवारी अलोट उत्साह आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडेरायाच्या गडाची प्रतिकृती असलेला देखावा पाहावयास मिळणार असून शिवाजी महाराज चौक ते अंबा देवी कॉलनीदरम्यान काढण्यात आलेल्या दिमाखदार मिरवणुकीत शेकडो भाविक सहभागी झाले. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'आई माऊली'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. मिरवणूक मंडपात पोहोचल्यानंतर आदर्श महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत आणि श्री. रोशन भगत यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची शास्त्रोक्त विधीनुसार स्थापना करण्यात आली. यावेळी त्यांनी श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून आई माऊलीचे स्वागत केले. त्यानंतर महिला आणि भाविकांनी माऊलीची आरती करत दर्शन घेतले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'तारीख ठरली आगमनाची, ओढ लागली तुझ्या दर्शनाची' या भावनेने माऊलीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. देवीच्या मंगलमय स्थापनेनंतर आदर्श मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवातील पुढील नऊ दिवसांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उत्साहात प्रारंभ झाला आहे.



## वाहतूक कोंडीविरोधात मनसे, काँग्रेससह राष्ट्रवादीचा एल्गार!

- मा. आमदार राजू पाटील यांच्या नेतृत्वाखाली भव्य जनआंदोलन

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : कल्याण फाटा ते शिळफाटा मार्गावर दररोज होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांसह स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्येवर प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने माजी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता कल्याण फाटा येथे तीव्र जनआंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मनसेचे जिल्हा सचिव राहुल कामत, डोंबिवली शहराध्यक्ष हर्षद पाटील, अरुण जांभळे, योगेश पाटील आणि माजी नगरसेविका कोमल पाटील यांच्यासह शेकडो मनसैनिक व पदाधिकारी सहभागी झाले. आंदोलकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत रस्त्यांची दुरवस्था, अपुरे वाहतूक नियोजन आणि सातत्याने होणाऱ्या कोंडीबाबत संताप व्यक्त केला. वाहतूक कोंडीवर तातडीने ठोस तोडगा न काढल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही मनसेच्या वतीने देण्यात आला. विशेष म्हणजे नागरिकांच्या या प्रश्नावर मनसेच्या आंदोलनाला इतर राजकीय पक्षांचाही पाठिंबा मिळाला. काँग्रेसचे डोंबिवली शहराध्यक्ष अमित म्हात्रे पदाधिकाऱ्यांसह आंदोलनात सहभागी झाले, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते भालचंद्र (भाऊ) पाटील यांनीही उपस्थित राहून पाठिंबा दर्शवला. सर्वपक्षीय पाठिंब्यामुळे आंदोलनाला आणखी बळ मिळाले असून, आता पोलीस आणि संबंधित रस्ते विकास यंत्रणा वाहतूक कोंडीवर कोणती ठोस उपाययोजना करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पोंदेवाडीत नवरात्रोत्सव निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

मंचर (स. गांवकरी) : पोंदेवाडी ( तालुका आंबेगाव) येथील गडदादेवी मंदिरामध्ये नवरात्र उत्सवा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक 11/ 10/2026 ते 20/10/2026 या कालखंडामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार असल्याचे माजी सरपंच अनिल वाळुंज यांनी सांगितले. पोंदेवाडी तालुका आंबेगाव येथील गडदादेवी मंदिरा मध्ये गावकरी दरवर्षी नवरात्र उत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करत असतात याही वर्षी या ठिकाणी दिनांक 11 ते दिनांक 20 या कालखंडामध्ये ह.भ.प. तुषार महाराज पाबळे यांची संत ज्ञानेश्वर माऊली चरित्र कथा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रोज सायंकाळी साडेसहा ते नऊ या वेळेत संपन्न होणार आहे.



# पालकत्त्वाच्या भावनेतून विद्यार्थ्यांचे संगोपन करा : डॉ. अशोक उईके

ओतूर : (स. गांवकरी)

शासकीय आदिवासी आश्रम शाळांतील अधीक्षक व अधीक्षिकांनी केवळ नोकरी म्हणून काम न करता आदिवासी विद्यार्थ्यांचे पालक म्हणून संगोपन करावे, असे प्रतिपादन आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले. अधीक्षक संघटनेच्या प्रतिनिधींशी झालेल्या भेटीत त्यांनी विद्यार्थ्यांचे हित आणि आश्रमशाळांमधील व्यवस्थेबाबत सकारात्मक चर्चा केली. आदिवासी शासकीय आश्रमशाळा अधीक्षक संघटना, महाराष्ट्र राज्याच्या प्रतिनिधी मंडळाने अधीक्षक व अधीक्षिकांच्या प्रलंबित सेवाविषयक आणि प्रशासकीय प्रश्नांबाबत ता. ६ ऑक्टोबर रोजी मंत्रालय मुंबई येथे मंत्र्यांची भेट घेतली. यावेळी पदोन्नती, जुनी पेन्शन योजना, विद्यार्थी सुरक्षा, मनुष्यबळ, कामाचे तास आणि पायाभूत सुविधांसह विविध विषय मांडण्यात आले. अधीक्षक व अधीक्षिका दीर्घकाळ एकाच पदावर कार्यरत राहत असल्याने विभागीय परीक्षेद्वारे पदोन्नतीची संधी द्यावी, तसेच वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक, संशोधन सहायक व नियोजन अधिकारी, यासारख्या पदांवर पदोन्नतीचा मार्ग खुला करावा, अशी मागणी करण्यात आली.

जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन संघटनेने केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक आश्रमशाळेत तीन शिफ्टमध्ये सुरक्षारक्षक, रिक्त चतुर्थश्रेणी पदांची भरती आणि आवश्यक सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. अशीही मागणी आहे. सर्व आश्रमशाळांमध्ये मध्यवर्ती स्वयंपाकगृह, सुरक्षित संरक्षक भिंती, मूलभूत सुविधा आणि दर्जेदार गणवेश उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. मंत्र्यांनी संघटनेचे प्रश्न सकारात्मकतेने ऐकून घेतले.

# पारनेरमध्ये काँग्रेस पक्षाला घरघर

- पारनेरमध्ये काँग्रेस पक्षाला घरघर
- तालुकाध्यक्ष पद निष्ठावंतांना डावलून आया रामांना संधी दिल्यामुळे संभाजी रोहोकले सर यांची नाराजी
- काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे



पारनेर : (स. गांवकरी)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पारनेर तालुका तालुकाध्यक्ष निवडीवरून पक्षाअंतर्गत मतभेदामुळे काँग्रेस पक्षाला घरघर लागणार आहे.

काँग्रेस पक्षाचे तालुकाअध्यक्ष संभाजीराव रोहोकले सर यांच्यासह तालुका कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांनी रविवार दि. ११ रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह पारनेर येथे पत्रकार परिषद घेऊन पारनेर तालुका काँग्रेसच्या नवीन अध्यक्षांच्या निवडी विषयी नाराजी व्यक्त करत निषेध व्यक्त केला आहे. या पत्रकार परिषदेला कार्याध्यक्ष सुरेशराव मेसे, बाळासाहेब रोहोकले सर, युवक तालुकाध्यक्ष योगेश शिंदे, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष गणीभाई इनामदार, सेवा दल अध्यक्ष संजय मेचे , ओबीस सेल अरविंद्र लोंढे , मागासवर्गीय सेल अजित साळवे, बेबीताई गोरडे, सरचिटणीस अभिजित कारखिले , यश राहाणे , भटक्या जाती जमाती अध्यक्ष रावसाहेब सांगळे, सोशल मिडिया अध्यक्ष सुनिल व्यवहारे , तेजस सकट, शैलजा कारखिले, गोरख रोहोकले , संजय रासकर , रामदास ठुबे , संतोष काकडे, अजित सांगळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना रोहोकले सर म्हणाले की, पारनेर तालुका काँग्रेसच्या नवीन अध्यक्षांची निवड ही अतिशय चुकीच्या पद्धतीने झालेली आहे. जे राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये आहे त्यांनी कधीही काँग्रेस पक्षाचे काम केले नाही. जे काँग्रेस पक्षाचे प्राथमिक सदस्य सुद्धा नाही अशा लोकांना तालुकाध्यक्षपदी निवड करून निष्ठावंतांना डावलले गेले आहे. तालुक्यामध्ये काँग्रेस पक्षाचे १९८५ सालापासून मी काँग्रेस पक्षाचे काम करत आहे माजी खासदार बाळासाहेब विखे, राधाकृष्ण विखे, बाळासाहेब थोरात यांच्यासोबत काम केलेले आहे. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकी मध्ये विखे परिवाराने भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर मी त्यांच्या समावेशात न जाता मी काँग्रेस पक्षामध्येच राहण्याचा निर्धार घेतला. यानंतर काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी माझ्यावरती तालुका अध्यक्ष पदाची धुरा सोपवली होती. गेल्या आठ वर्षापासून तालुक्यामध्ये काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी प्रत्येक वाडी वस्तीवर जाऊन सर्वतोपरी प्रयत्न केलेला आहे. नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील यांनी 26 ऑक्टोबर पारनेर येथे तालुकाध्यक्ष फेरबदल बैठक बोलावली होती या बैठकीला तालुका कार्यकारणीचे प्रमुख बोलवा असे त्यांनी सांगितले या बैठकीला मोजकेच पदाधिकारी उपस्थित राहिले. बैठक संपन्न झाल्यानंतर मी पारनेर तालुका दूध संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गेलो असता. यानंतर गेल्या दोन तासानंतर याच ठिकाणी ज्ञानदेव वाफारे यांनी पक्षा व्यतिरिक्त बाहेरील कार्यकर्त्यांना बोलावून ईश्वर दिवटे यांच्या नावाचा ठराव झाला असे वरिष्ठांना भासवले या झालेल्या प्रकाराबद्दल काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली यावेळी थोरात म्हणाले होते की तालुक्यामध्ये फेरबदल करताना तुम्हाला विश्वासात घेतल्याशिवाय फेरबदल करणार नाही असे सांगितले होते मात्र त्यांनीही आम्हाला दिलेला शब्द पाळला नाही. ज्ञानदेव वाफारे यांच्या सांगण्यावरून दक्षिण जिल्हाध्यक्ष किरण पाटील यांनी पारनेर काँग्रेसच्या तालुकाअध्यक्षपदी ईश्वर दिवटे यांची निवड केलेली आहे . झालेली तालुका अध्यक्ष पदाची निवड ही आम्हाला मान्य नाही यामुळे तालुका कार्यकारणीच्या प्रमुखांनी सामूहिक राजीनामे देण्याची भूमिका घेतलेली आहे. पतसंस्थेच्या आर्थिक घोटाळ्यात मोठा गुन्हा केलेले ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली आहे परंतु एक कोटी रुपयाचा जामीन त्यांनी भरलेला आहे. त्यांनी हे एक कोटी रुपये कोठून आणले आहे त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत काय..? या माणसाचे राजकारणातले स्थानिक नेतृत्व ऐकत असून ते ऐकू नये अशी सर्वसामान्य कार्यकर्त्यांची इच्छा असून साहेब म्हणायच्या लायकीचे ज्ञानदेव वाफारे नाहीत अशी बोचरी टीका तालुकाध्यक्ष संभाजी रोहोकले सर यांनी केली आहे.

# ऑक्टोबर हिटचा शेतीला फटका; धना, मेथी, शेपूच्या उगवणीत घट

## वाढत्या तापमानामुळे शेतकरी चिंतेत; पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन

मंचर : (स. गांवकरी)

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात ऑक्टोबर महिन्यात वाढलेल्या तापमानाचा शेतीला फटका बसत असून, धना, मेथी आणि शेपू या पालेभाज्यांच्या पेरणी केलेल्या बियाण्यांची उगवण क्षमता घटल्याचे चित्र दिसून येत आहे. वाढत्या उन्हामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने पेरणी केलेले बियाणे व्यवस्थित उगवत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यातच परिसरात दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

ऑक्टोबर हिटमुळे शेतीसाठी पाण्याची गरज वाढली आहे. मात्र, उपलब्ध पाणीसाठा मर्यादित असल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे. एकीकडे पालेभाज्यांची उगवण कमी होत असल्याने बियाणे, मशागत आणि



मजुरीवर केलेला खर्च वाया जाण्याची भीती आहे, तर दुसरीकडे पिके जगवण्यासाठी पाण्याचे नियोजन करणे आवश्यक झाले आहे. पाऊस झाला नाही, तर उपलब्ध पाणीसाठा केवळ दोन महिने पुरेल, अशी परिस्थिती असल्याचे कृषीपदवीधर जयेश वाळुंज यांनी सांगितले. वाढत्या तापमानामुळे पिकांना अधिक पाणी द्यावे लागत असले, तरी दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा जपून वापर करणे गरजेचे आहे. पावसाने ओढ दिल्यास शेतीसह जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करावे, तसेच जनावरांसाठी चाऱ्याची आतापासून व्यवस्था करावी, असे आवाहन सरपंच वाळुंज नगरचे माजी सरपंच महेंद्र वाळुंज यांनी केले.

परिसरात पावसाने साथ न दिल्यास पालेभाज्यांसह इतर पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच पावसाच्या अनिश्चिततेमुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता वाढत्या तापमानाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आगामी काळात पाऊस पडणार की नाही आणि उपलब्ध पाणीसाठा किती दिवस पुरणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पूर्व आंबेगावात भाद्रपद बैलपोळा उत्साहात!

मंचर : (स. गांवकरी)

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, लाखणगाव, देवगाव, लोणी आणि धामणी परिसरात भाद्रपद बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतीकामात वर्षभर शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना सजवून त्यांची पारंपरिक पद्धतीने पूजा केली. बैलपोळ्यानिमित्त गावोगावी सणाचे वातावरण पाहायला मिळाले. शेतकऱ्यांनी बैलांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांच्या शिंगांना रंग लावले. अंगावर आकर्षक झूल, गळ्यात घुंगरांच्या माळा, रंगीबेरंगी दोर आणि विविध अलंकार घालून बैलांना सजविण्यात आले. सजविलेल्या बैलांच्या जोडीचे रूप पाहण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती.



शेतीमध्ये आधुनिक यंत्रांचा वापर वाढत असला, तरी ग्रामीण भागात बैलांचे महत्त्व आणि त्यांच्याविषयीची आत्मीयता आजही कायम आहे. बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते जपणारी परंपरा आहे. या दिवशी बैलांना शेतीच्या कामातून विश्रांती देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

# मूल्यवर्धन शिक्षण ही काळाची गरज : नीळकंठ बोरुडे

## होलेवाडीत लिंपणगाव केंद्राची मूल्यवर्धन शिक्षण परिषद उत्साहात; शिक्षकांनी मांडले वर्षभरातील उपक्रमांचे अनुभव

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजविण्यासाठी मूल्यवर्धन शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शालेय स्तरावर मूल्यवर्धनाचे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्रीगोंदा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी नीळकंठ बोरुडे यांनी केले.

होलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लिंपणगाव केंद्राची मूल्यवर्धन शिक्षणविषयक केंद्रस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत मार्गदर्शन करताना बोरुडे बोलत होते. सन २०२५ मध्ये मूल्यवर्धन प्रशिक्षणांतर्गत शाळांमध्ये वर्षभर राबविण्यात आलेले विविध उपक्रम, त्यासाठी शिक्षकांनी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न आणि या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये घडलेले सकारात्मक बदल यांवर विचारविनिमय करण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. लिंपणगाव केंद्रातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे शिक्षक या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी नीळकंठ बोरुडे यांनी मूल्यवर्धन शिक्षणाचे महत्त्व विशद केले. शालेय स्तरावर मूल्यवर्धन



शिक्षणाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे कशी करता येईल, विद्यार्थ्यांमध्ये विविध जीवनमूल्यांची जोपासना करण्यासाठी कोणते उपक्रम राबविता येतील आणि त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग कसा वाढविता येईल, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. लिंपणगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख रजनी नलगे यांनीही मूल्यवर्धन शिक्षणाची आवश्यकता आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आपले विचार मांडले. शेंडेवाडी प्राथमिक शाळेचे शिक्षक भानुदास तांदळे यांनी मूल्यवर्धन शिक्षणांतर्गत विविध उपक्रमांची माहिती देत आपले अनुभव कथन केले. त्यांनी विविध शैक्षणिक गीते सादर करून उपस्थित शिक्षकांमध्ये उत्साह निर्माण केला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजविण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, लिंपणगाव येथील शिक्षक महादेव पवळ यांनी विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना कशी करावी, मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढवावा आणि दैनंदिन शालेय जीवनातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे शिक्षण कसे देता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना रसाळ यांनी केले. होलेवाडी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर सातपुते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

या परिषदेला मुख्याध्यापक ईश्वर गोरे, संभाजी पठारे, बाळासाहेब अनपट, संदीप हिरवे, विजय खर्च, अजय घोडके, गणेश शेंडगे, विजय निगडे, संदीप दांगडे, खुळे मॅडम, पारे मॅडम, नारायण इंगळे, सुंदर कांबळे, मनीषा दातीर, राजेंद्र सोनवणे, अमोल जाधव, अशोक दांगडे, केशव ढगे, मनीषा गायकवाड, मीरा खेडकर, वाल्मीक जगताप, रघुनाथ भालेकर, मनोज डोमाळे, सोनाली दिवटे, बापुराव अनंत्रे, विकास पाटील, नीता सूर्यवंशी, सीमा गोरे, शीतल मोरे यांच्यासह लिंपणगाव केंद्रातील शिक्षक उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे




## डिंभे धरणातून पाणीगळती; २१ हजार हेक्टर शेतीवर परिणामाची शक्यता!

डिंभे/आंबेगाव (स. गांवकरी) : डिंभे धरणाच्या भिंतीतून प्रतिमिनिट नव्हे, तर तब्बल १ हजार ८०० लिटर प्रतिसेकंद वेगाने पाणीगळती होत असल्याची माहिती समोर आली आहे. या गळतीमुळे दररोज सुमारे १५ कोटी ५५ लाख लिटर पाणी वाया जात असून, गळतीचा वेग कायम राहिल्यास वर्षभरात जवळपास २ टीएमसी पाणी बाहेर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सन २०२६-२७ मध्ये परिसरात २१ हजार ३९२ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. भात, सोयाबीन, मका, बटाटा आणि ऊस या पिकांसाठी आगामी काळात पाण्याचे नियोजन महत्त्वाचे असताना, धरणातील गळतीमुळे पाणीसाठ्यावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. धरणातून मोठ्या प्रमाणात होणारी पाणीगळती थांबवण्यासाठी तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरणाची कामे हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे. धरणातील पाणीसाठा आणि शेतीचे हित लक्षात घेता संबंधित जलसंपदा विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.



## गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी श्रीकांत शिंदे फाउंडेशनचा पुढाकार!

- भातोडी पारगावच्या जिल्हा परिषद शाळेत मोफत वह्या व पेनचे वाटप

श्रीगोंदा (स. गांवकरी) : आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने डॉ. खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने नगर तालुक्यातील भातोडी पारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून, सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही देण्यात आला. डॉ. खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वैद्यकीय मदत कक्षाचे अहिल्यानगर जिल्हा समन्वयक दिनेश लोंढे, श्रीगोंद्याचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पोकळे आणि जिल्हा अधिवक्ता हर्षद काकडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. राजेंद्र पोकळे यांच्या सहकार्याने तसेच यांच्या प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. या वेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक मांडुळे व ढोकळे, ग्रामविकास अधिकारी घुमरे, शिक्षण समिती सदस्य शेख भाभी, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अनिल तनपुरे, राज्यकर्ते ग्रुपचे अध्यक्ष सचिन शिंदे, शालेय समितीचे सदस्य महेश शिंदे, शिवतेज शिंदे, अभी शिंदे, बंटी जगताप, आदिनाथ शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रहार संघटनेचे सचिव हमीद शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नानांच्या स्मृती जपण्यासाठी वाघदरा पाझर तलावाला नाव देण्याचा निर्णय!




आंबेगाव (स. गांवकरी) : ज्येष्ठ अभिनेते आणि नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर यांनी अभिनयासोबतच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आणि जलसंधारणाच्या कामासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनानंतर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक ग्रामस्थांनी त्यांच्या कार्याच्या स्मृती जपण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नाम फाउंडेशनच्या निधीतून अवसरी बुद्रुक परिसरात वाघदरा पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली असून, या तलावामुळे परिसरातील शेतीला पाण्याचा आधार मिळाला आहे. नाना पाटेकर यांच्या निधनानंतर ग्रामपंचायतीत झालेल्या सभेत ग्रामस्थांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी वाघदरा पाझर तलावाला 'नाना पाटेकर वाघदरा पाझर तलाव' असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाणी व जमिनी वर त्यांचाच हक्क



शिवनेरी (स. गांवकरी) :जुन्नर तालुक्यात आदिवासी भागातील आदानी प्रकल्प . जनकल्याण - लातूर महामार्ग शेतकऱ्यांवर लादू देणार नाही . तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाणी व जमिनीवर त्यांचाच हक्क राहील . असे खासदार संजय राऊत यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत प्रखट भूमिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सांगितली . यावेळी ज्येष्ठ कीर्तनकार ह भ प संतदास मनसुख , शिवसेना उपनेते बबन थोरात , संपर्कप्रमुख किरण तावडे , तालुका अध्यक्ष भास्कर गाडगे , माजी पं सं स कावा गागरे , उप सभापती अमित ढोले, माजी उपसभापती दिलीप डुंबरे, मयुर रोकडे, संदिप ताजणे , बन्सी चतुर , पदाधिकारी , सर्व शिवसैनिक उपस्थित होते .



अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील मेहेंदुरी येथील हनुमान मंदिर देवस्थान येथे शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकार शांताराम संगारे यांना सतरंजी व घड्याळ प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, स्वाभिमानी सचिव संघटनेचे संस्थापक गणेश रेवगडे आणि संजय फुलसुंदर यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

# वृषाली मोटेचे सुवर्ण यश

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



गोवा येथे पार पडलेल्या मानाच्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत (National Thai Kick B o xing Championship) सोनिया गांधी पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ( AI) शाखेची विद्यार्थिनी कु. वृषाली प्रकाश मोटे हिने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकासह मानाचा 'प्रथम सुवर्ण टायटल बेल्ट' (1st Title Belt) पटकावला आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे महाविद्यालयाचे आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय क्रीडा पटलावर उंचावले आहे. गोवा येथे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून अव्वल व नामांकित खेळाडू सहभागी झाले होते. अतिशय चुरशीच्या आणि अटीतटीच्या झालेल्या लढतींमध्ये वृषालीने आपल्या तंत्रशुद्ध खेळीचे, वेगवान हालचालींचे आणि प्रचंड आत्मविश्वासाचे प्रदर्शन घडवले. प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या आव्हानावर मात करत तिने अंतिम फेरीत धडक मारली आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरून प्रतिष्ठेचा टायटल बेल्ट स्वतःच्या नावावर केला.

तांत्रिक शिक्षणाचे कठीण अभ्यासक्रम पूर्ण करत असतानाच क्रीडा क्षेत्रात नियमित सराव आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे. तंत्रज्ञान आणि क्रीडा अशा दोन्ही आघाड्यांवर तिने दाखवलेला हा समन्वय इतर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे. या दैदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. राजेंद्रदादा नागवडे, निरीक्षक श्री. सूर्यभान गोलांडे सर, ज्ञानदीप ग्रामीणविकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक श्री. बी. के. लगड सर, प्राचार्य श्री. अमोल नागवडे सर, विभागप्रमुख प्रतापसिंह नागणे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वृषाली मोटे हिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि तिच्या भावी क्रीडा प्रवासास शुभेच्छा दिल्या. तिच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमींसह सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



राज्यभरातील पत्रकारांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व घड्याळ देऊन कुंडलिक वाळेकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संजय फुलसुंदर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.





## साऊ एकल महिला समिती कार्यालयाचे उद्घाटन

अकोले : (स. गांवकरी)

आमचे एकल महिलांचे काम १२० तालुक्यात सुरू आहे..आमच्या अकोल्यात साऊ एकल महिला समितीचे कार्यालय नवीन ठिकाणी सुरू करण्यात आले. त्याचे उद्घाटन तालुक्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांच्या हस्ते झाले...यावेळी मोठ्या संख्येने आमच्यावर प्रेम करणारे अकोल्यातील राजकीय सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने एकल महिला उपस्थित होत्या.

आजपर्यंत अकोले तालुक्यात ४८ महिलांचे व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत.

किमान १०० व्यवसाय सुरू करण्याचा संकल्प आहे..राज्यभरात आम्ही करत असलेल्या कामात इथून पुढे व्यवसाय उभे करत आहोत.

## चक्क रविवारीही भरणारी महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषद शाळा!

नंदुरबार : (स. गांवकरी)




नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शहरापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या लंगडी भवानी या शंभर टक्के आदिवासी लोकवस्तीच्या गावातील जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळा सध्या एका अनोख्या उपक्रमामुळे चर्चेत आली आहे. रविवार असो किंवा शासकीय सुट्टी, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांची भाषिक कौशल्ये विकसित व्हावीत आणि त्यांचा शैक्षणिक पाया भक्कम व्हावा, या उद्देशाने येथील एक शिक्षक सातत्याने प्रयत्नशील आहेत. शिक्षकाची ही शिक्षणाप्रती असलेली तळमळ आणि पालकांचे सहकार्य यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरत आहे. आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्यात शिक्षणाच्या अनेक समस्या असताना लंगडी भवानी येथील जिल्हा परिषद शाळेने एक वेगळा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना मराठी भाषेबरोबरच इंग्रजी भाषाही आत्मविश्वासाने आणि स्पष्टपणे बोलता यावी, हा दृष्टिकोन समोर ठेवून शिक्षक प्रयत्न करत आहेत.

सर्वसाधारणपणे रविवार आणि शासकीय सुट्ट्यांच्या दिवशी शाळांना सुट्टी असते. मात्र, लंगडी भवानी येथील या शाळेत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, त्यांच्यात नियमित अभ्यासाची सवय निर्माण व्हावी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, यासाठी शिक्षक सुट्टीच्या दिवशीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिसून येतात. शिक्षण हे केवळ शाळेच्या वेळेपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे, या विचारातून हा उपक्रम राबविला जात असल्याचे चित्र आहे. शिक्षकांच्या या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली असून शाळेत येण्याबाबत त्यांच्यात उत्साह दिसून येत आहे.

या शाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे शुद्ध उच्चार, वाचन आणि संभाषण यांसोबतच इंग्रजी भाषेतही बोलता यावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात, या उद्देशाने शिक्षक विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासावर भर देत आहेत. विद्यार्थ्यांना लहान वयातच भाषेची योग्य ओळख झाली, तर पुढील शिक्षणात त्यांना अधिक आत्मविश्वासाने वाटचाल करता येते. याच जाणिवेतून विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये संवाद साधण्यास प्रोत्साहित केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची भाषेवरील पकड चांगली होत असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येते. या शाळेतील उपक्रमामागे शिक्षकांच्या मेहनतीबरोबरच पालकांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरत आहे. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत यावे, अभ्यासात सातत्य ठेवावे आणि शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यात प्रगती करावी, यासाठी पालक सकारात्मक भूमिका घेत आहेत. शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळत आहे.

## अकोल्याच्या विकासासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवा

- शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आम्ही सर्व एकच ; डॉ. सुजय विखे पाटील
- जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांना समन्वयाचे आवाहन

राजूर (अकोले) : (स. गांवकरी)




राजकारणात आरोप-प्रत्यारोप, मतभेद आणि निवडणुकीतील संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला, तरी शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि तालुक्याच्या विकासासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येणे आवश्यक आहे. राजकीय मतभेद असले, तरी आम्ही एकमेकांचे शत्रू नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आम्ही सर्वजण एक आहोत, अशी स्पष्ट भूमिका भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडली नवरात्री घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर राजूर येथे एका दुकानाचे उद्घाटन सुरू केलेल्या 'हृदया कलेक्शन' या दालनाचे उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आमदार किरण लहामटे आणि माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी डॉ. विखे पाटील यांनी . या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांतील नेत्यांची उपस्थिती होती.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांना विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने अकोले तालुक्यात येताना काहीशी काळजी वाटत होती, अशी मिश्कील टिप्पणी करत त्यांनी तालुक्यातील राजकीय वातावरणाकडे लक्ष वेधले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यातील विविध प्रवर्गांतून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावरून तालुक्यातील राजकीय जागरूकता आणि सहकार क्षेत्रातील सक्रियता स्पष्ट होते. अकोले तालुक्याला वैचारिकतेची परंपरा लाभली आहे. राजकीय मतभेद असतानाही तालुक्याच्या प्रश्नांवर एकत्र काम करण्याची तयारी लोकप्रतिनिधींनी दाखवली, तर विकासाला अधिक गती मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले. स्वर्गीय बाळासाहेब विखे पाटील यांच्यापासून विखे पाटील परिवाराने जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले आहे. अकोले तालुक्याशीही परिवाराचे जुने संबंध आहेत, असे सांगत डॉ. विखे पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांनी केलेल्या स्वागताबद्दल आभार यांनी जपलेली माणुसकी, नाती आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती यामुळे वेगवेगळ्या राजकीय विचारांचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिल्याचे त्यांनी नमूद केले. राजकारणात मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र त्यामुळे वैयक्तिक संबंधांमध्ये कटुता निर्माण होऊ नये.

## कालेजी देवी मंदिरात नवरात्र महोत्सवाचे आयोजन

- विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची जेयत तयारी

मुदखेड : (स. गांवकरी)

मुदखेड येथील प्रसिद्ध कालेजी देवी मंदिर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही नवरात्रोत्सव व दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

हा उत्सव ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत संपन्न होणार असून, सर्व भाविक भक्तांसाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सावातील प्रमुख कार्यक्रमः घटस्थापना व महाप्रसाद (११ ऑक्टोबर, रविवार): सकाळी घटस्थापना व महाप्रसाद होईल. सायंकाळी ७ ते १० या वेळेत कालेजी देवी साहित्य व संस्कृती सेवा मंडळ, मुदखेड यांचा कार्यक्रम रंगेल. भजन व अभंगवाणीचे आयोजनः १२ ऑक्टोबरः शिवपार्वती भजनी मंडळ. १३ ऑक्टोबर शारदा नगर महिला भजनी मंडळ व सायंकाळी श्री कालीदास सु. चौधरी यांची अभंगवाणी. १४ ऑक्टोबरः संत जनाबाई भजनी मंडळ व अपरंपार भजनी मंडळ मठगल्ली. १५ ऑक्टोबर एकनामी दत्तकृपा भजनी मंडळ. १६ ऑक्टोबर स्वर विलास संगीत विद्यालय नांदेड प्रस्तुत कृष्णा चौधरी यांची अभंगवाणी. १७ ऑक्टोबर स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ बापुसाहेब नगर, सन्मित्र कॉलनी. १८ ऑक्टोबर कै. यशवंतराव डांगे संगीत विद्यालय मुदखेड प्रा. तानाजी मेटकर व विद्यार्थी. प्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तनसेवा सायंकाळी ५ ते ७.१५.

१२ ऑक्टोबरः ह.भ.प. सौ. वैशाली (क्षमा) वि. नांदेडकर., १४ ऑक्टोबरः ह.भ.प. विलास गुरु लिंबेकर महाराज. १५ ऑक्टोबरः ह.भ.प. अवधुत महाराज टाकळीकर.

## कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे यांचा स्मृतिदिन साजरा



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

आणे-माळशेज घाटाचे शिल्पकार, जुन्नर तालुक्याचे भाग्यविधाते आणि सर्वसामान्य जनतेचे आधारवड म्हणून ओळखले जाणारे कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे ऊर्फ झांबरशेठ यांचा ५३ वा स्मृतिदिन ओतूर येथील चैतन्य विद्यालयाच्या स्व. भरत एकनाथ तांबे सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे आणि कै. आमदार लता श्रीकृष्ण तांबे यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या भूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. अशी माहिती ग्रामविकास मंडळ, ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे यांनी दिली. मानपत्र आणि मानचिन्ह देऊन दोन्ही मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यावेळी आमदार शरद सोनवणे, सत्यशील शेरकर, डॉ. मुक्ता अवचट-पुणतांबेकर आणि प्रसाद देशपांडे यांनी मनोगते व्यक्त केली.

## सिडको-हडको सह परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

**नागरिक त्रस्त महिला व लहान बालकांमध्ये भितिचे वातावरण ! मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष " पुर्वी मनपा प्रशासनाची यंत्रणा कार्यरत होती मग आत्ता का नाही ?**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



सिडको हाड़को परिसरासह औद्योगिक वसाहत आणि उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर झाला असल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकां सह लहान मुलाबाळां सह महिला मंडळींना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे कारण या कुत्र्याची टोळी कधी कुणावर हमला करतील सांगता येत नसुन ते अचानक एखाद्याच्या अंगावर गेले तर सर्वच टोळी मागे धावत जात असुन या मुळे महिला व लहान बाळांत भितीचे वातावरण निर्माण झाले असुन कोनता अनुचित प्रकार घडणार नाही या पुर्वी मनपा प्रशासनाने लक्ष देऊन या कुत्र्यांच्या टोळीचा बंदोबस्त करून सर्व सामान्य जनतेला दिलासा द्यावा कारण मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष " या पुर्वी मनपा प्रशासनाची यंत्रणा कार्यरत होती मग आत्ता का नाही ?. अशी मागणी सिडको हाडको परिसरातील भयभित लहान विद्यार्थी पालक व महिला मंडळी यांसह जेष्ठ नागरीकांनी केली आहे.

शहरातील सिडको-हडको परिसरासह औद्योगिक वसाहत आणि सिडको परिसरालगत असलेल्या उस्माननगर रोड वर मोकाट कुत्र्यांचा हौदोस मोठ्या प्रमाणावर वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर आणि वसाहती सह गल्ली बोळा अंतर्गत मार्गावर मोकाट कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सिडको-हडको परिसरात सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे.औद्योगिक वसाहतीमध्ये ये-जा करणारे कामगार आणि वाहनचालकांनाही या समस्येचा त्रास मोठया प्रमाणात सहन करावा लागत आहे. उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर लक्षात घेता भविष्यात एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित मनपा प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वनरक्षक-वनपाल कर्मचाऱ्यांचा काळे कपडे परिधान करून निषेध

## प्रलंबित प्रश्नांवर तोडगा न निघाल्याने नाराजी : आहवा येथे चिंतन शिबिराचे आयोजन; प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आगामी आंदोलनाची रणनीती आखली

डांग : (स. गांवकरी)



गुजरात राज्य वनरक्षक कर्मचारी मंडळाच्या आंदोलनाचा एक भाग म्हणून डांग जिल्ह्यातील आहवा येथे वनरक्षक आणि वनपाल कर्मचाऱ्यांच्या चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात डांग जिल्ह्यातील मोठ्या संख्येने वनरक्षक व वनपाल कर्मचारी सहभागी झाले होते. राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांचे निराकरण करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी काळे कपडे परिधान करून प्रशासनाविरोधात आपला निषेध नोंदवला. या चिंतन शिबिरादरम्यान कर्मचाऱ्यांनी खाकी पँटसोबत काळे शर्ट आणि टी-शर्ट परिधान करून आपली नाराजी व्यक्त केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांवर अद्याप समाधानकारक तोडगा न निघाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण असल्याचे दिसून आले. शिबिरात कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच आगामी काळात आंदोलन अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी पुढील दिशा आणि रणनीती निश्चित करण्यात आली.

निषेध आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी "प्रस्ताव नको, भत्ता द्या" आणि "आश्वासने नकोत, रजा वेतन द्या" अशा घोषणांद्वारे आपल्या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. केवळ प्रस्ताव आणि आश्वासने देण्याऐवजी प्रत्यक्ष मागण्यांची अंमलबजावणी करावी, अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी मांडली. यासोबतच यापूर्वी देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता करून प्रलंबित प्रश्नांचा लवकरात लवकर निपटारा करावा, अशी मागणीही करण्यात आली.

आहवा येथे आयोजित या चिंतन शिबिराच्या माध्यमातून डांग जिल्ह्यातील वनरक्षक आणि वनपाल कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी एकजूट आणि ठाम भूमिका दर्शवली आहे. आता वन विभागाचे प्रशासन या प्रश्नांवर कोणती पावले उचलते आणि आगामी काळात हे आंदोलन कोणते स्वरूप धारण करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोकराव उगले यांच्या मातोश्री कै. भागुबाई कारभारी उगले यांचे निधन झाल्याने उगले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उगले कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन कै. भागुबाई उगले यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नारायण उगले, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक अविनाश उगले, महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका सौ. परीघा आरोटे यांच्यासह उगले व आरोटे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. सर्वांनी उगले कुटुंबीयांचे सांत्वन करून या दुःखाच्या प्रसंगी त्यांना धीर दिला.

## थोडक्यात बातम्या...



### "जटायू विमानतळ, नाशिक" असे नामकरण करण्यात यावे

नाशिक (स. गांवकरी) : नाशिकच्या ओझर विमानतळाला "जटायू विमानतळ, नाशिक" असे नामकरण करण्यात यावे, या मागणीचे निवेदन आज नाशिक दौऱ्यावर आलेले राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना देण्यात आले. विरक्त साधू समाज नाशिक मंडळ नाशिक ट्रस्ट एवं श्री क्षेत्र नाशिक आद्य संत महंत मंडळ नाशिक चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने हे निवेदन देण्यात आले. २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या धार्मिक व सांस्कृतिक ओळखीला साजेसे नाव विमानतळाला द्यावे, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. नाशिक ही प्रभू श्रीरामांची पावन भूमी असून माता सीतेच्या रक्षणासाठी प्राणाची पर्वा न करता रावणाशी लढणारे जटायू महाराज हे त्याग आणि धर्मरक्षणाचे प्रतीक आहेत. नाशिक जिल्ह्यातील टाकेद येथे जटायू महाराजांचे मंदिर असून या मागणीला धार्मिक अधिष्ठान आहे. यावेळी महंत भक्तीचरण दास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विलासभाऊ पांगारकर, गोरे राम मंदिराचे महंत राजारामदासजी महाराज, सर्वतीर्थ टाकेद चे अँड महंत किशोरदास उर्फ रामकिशोरदास श्रीवैष्णव ,सनातन धर्म वैदिक धर्म सभेचे नरहरी उगलमुगले, पत्रकार अमोल सोनवणे, हेमंत काळमेख, अतुल पांगारकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री महोदयांनी निवेदनाचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

### श्री अंबाबाई मंदिराचा भव्य कळसारोहण सोहळा संपन्न!



अक्कलकोट (स. गांवकरी) : शारदीय नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी, घटस्थापनेच्या अत्यंत मंगल मुहूर्तावर पानमंगळूर येथील श्री अंबाबाई मंदिराचा दिव्य कळसारोहण सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात व मंगलमय वातावरणात पार पडला. या ऐतिहासिक व पावन सोहळ्यास अक्कलकोट नगरपरिषदेचे रॉयल नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी उपस्थित राहून श्री जगदंबेचे दर्शन घेतले तसेच पूज्य संतांचे आशीर्वाद ही प्राप्त करण्याचे भाग्य त्यांना लाभले. हा संपूर्ण सोहळा परमपूज्य ष.ब्र. १०८ श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी आणि श्री म. नि. प्र. शिवबसवराजेंद्र महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्याने पावन झाला. पूज्य महास्वामीजींच्या चरणी नतमस्तक होऊन सुख, शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. या मंगल प्रसंगी माझ्यासमवेत प्रमुख मान्यवर श्री डॉ. अशोक हिपरगी, श्री शिवयोगी स्वामी, श्री बाबुशा करपे, श्री रुद्रय्या स्वामी, श्री शिवसिद्ध बुळ्ळा, श्री सिद्धाराम याबाजी, सरपंच सौ. रत्नबाई महाजन , श्री प्रकाश हिपरगी, श्री धोंडप्पा महाजन, श्री चिदानंद कुंभार, श्री लक्ष्मण पुजारी, श्री मल्लिकार्जुन नागशेट्टी, श्री सतीश पवार, श्री पंचप्पा चराटे आणि श्री सागर हिपरगी यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक-भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीने व 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. आदिशक्ती श्री अंबाबाई सर्वांचे कल्याण करो, हीच आईच्या चरणी विनम्र प्रार्थना! अशी प्रार्थना त्यांनी या प्रसंगी केली.

# पी. आर. विद्यालयाच्या संघाचा दणदणीत विजय!

## १४ वर्षांखालील गटात अंतिम सामन्यात विजयी तुरा शिरपेचात घेऊन मुंबई विभागीय स्पर्धेत भरारी

ठाणे:भिवंडी : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्य क्रीडा संचलनालय पुणे अंतर्गत जिल्हास्तरीय शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२६-२७ अंतर्गत आयोजित १४ वर्षांखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेत पी. आर. विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम सामन्यात विजेतेपद पटकावले. रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी रईस हायस्कूल येथे झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी सांघिक कौशल्य, चपळता, जिद्द आणि खिलाडूवृत्तीच्या जोरावर विजय मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या विजयामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला असून, विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

या विजयी संघाचे नेतृत्व कर्णधार श्लोक म्हात्रे याने प्रभावीपणे केले, तर अष्टपैलू खेळाडू पूर्वेश पाटील याने आपल्या उत्कृष्ट खेळाने संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. संघातील सर्व खेळाडूंनी एकजूट, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर अंतिम सामन्यात आपली क्षमता सिद्ध केली. या संघाला श्री. प्रकाश भगत व श्री. साबळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या नियमित सरावातून, शिस्तबद्ध तयारीतून आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनातून हे यश साकार झाले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रंजना पाटील, उपमुख्याध्यापक अरुण जाधव, पर्यवेक्षक वानखेडे मॅडम, पंकज भोईर, क्रीडाप्रमुख निलेश नरवडे आणि साईनाथ म्हस्कर यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले व खेळाडूंच्या यशाचे कौतुक केले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी शाळा प्रशासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात असून, या विजयामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

पी. आर. विद्यालयाच्या कबड्डी संघाने मिळवलेले हे यश म्हणजे खेळाडूंची मेहनत, मार्गदर्शकांचे योगदान आणि विद्यालयाच्या प्रोत्साहनाचा गौरवपूर्ण परिणाम आहे. या विजयाबद्दल संपूर्ण संघाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.



**ग्रामीण भागातील पूर्वीचे वैभव म्हणजे मोठ मोठे वाडे** दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग या गावी असलेला हा हुल्ले वाडा आहे . पुर्वीच्या गर्भ श्रीमंतीचे हे ऐतिहासिक उदाहरण असून या वाड्यात पुर्वी ५०पेक्षा जास्त कुटुंबे राहत असत. फोटो सुयश डिजिटल मीडिया

# 'ऑपरेशन मिलाप' अंतर्गत बेपत्ता महिलेची कुटुंबीयांशी सुखद भेट

डांग : (स. गांवकरी)



डांग जिल्ह्यातील सापुतारा पोलिसांनी 'ऑपरेशन मिलाप' अंतर्गत मानवी संवेदनशीलता आणि तत्परता दाखवत तापी जिल्ह्यातून बेपत्ता झालेल्या ३६ वर्षीय महिलेला शोधून काढले. त्यानंतर महिलेला सुरक्षितपणे तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. सापुतारा पोलिसांच्या या कार्यामुळे महिलेला पुन्हा आपल्या कुटुंबीयांना भेटता आले. डांग जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक पूजा यादव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी के. आर. डिमरी यांच्या मार्गदर्शनाखाली सापुतारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. के. बारिया यांच्या पथकाला आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सापुतारा परिसरात सघन गस्त घालण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनांनुसार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री गस्त घालत असताना सापुतारा बसस्थानक परिसरात एक महिला एकटी झोपलेल्या अवस्थेत पोलिसांना आढळली. तिच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलिसांनी तिची चौकशी केली आणि तिला सापुतारा पोलीस ठाण्यात आणले. चौकशीदरम्यान या महिलेचे नाव अमिताबेन भूपेंद्रभाई चौधरी (वय ३६, रा. बेडकुवादूर, ता. व्यारा, जि. तापी) असल्याचे समोर आले. पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असता, ती मानसिक आजाराने त्रस्त असल्यामुळे कोणालाही न सांगता घरातून निघून गेल्याची माहिती मिळाली. याप्रकरणी तापी जिल्ह्यातील काकरापार पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची नोंद क्रमांक ०८/२०२६ दाखल करण्यात आली होती. यानंतर सापुतारा पोलिसांनी तातडीने काकरापार पोलीस ठाणे आणि महिलेच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

# नागवडे कारखान्याला ऊस देऊन सहकार चळवळ बळकट करावी!

## युवा नेते संतोष रोडे पाटील यांचे शेतकऱ्यांना आवाहन; ऊस उत्पादकांचे हित जपणाऱ्या कारखान्याला साथ देण्याचे केले आवाहन

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील ऊस उत्पादक सभासद व शेतकऱ्यांनी आगामी गळीत हंगामात नागवडे सहकारी साखर कारखान्याला जास्तीत जास्त ऊस घालून कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी करावा. सहकारी साखर कारखानदारी टिकविण्यासाठी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उसाला रास्त भाव मिळण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे आवाहन युवा नेते संतोष रोडे पाटील यांनी केले.

श्रीगोंदा तालुक्यात सहकाराच्या माध्यमातून उभा राहिलेला नागवडे सहकारी साखर कारखाना हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा कारखाना आहे. स्वर्गीय आमदार शिवाजीराव बापू नागवडे यांनी या कारखान्याची मुहूर्तमेढ रोवून सहकार चळवळीला बळ दिले. त्यांच्यानंतर विद्यमान चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी कारखान्याची धुरा सांभाळत ऊस उत्पादक सभासदांच्या हिताला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. कारखान्याच्या माध्यमातून विविध योजना व प्रकल्प राबवून शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

सहकारी साखर कारखानदारी अडचणीतून बाहेर काढून ती टिकविण्यासाठी दूरदृष्टीने निर्णय घेणे आवश्यक असते. सहकार टिकविण्याची संपूर्ण जबाबदारी केवळ चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांची नसून, प्रत्येक ऊस उत्पादक शेतकरी, सभासद आणि संचालक मंडळाचीही तितकीच जबाबदारी आहे. त्यामुळे कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी संचालकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधावा. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे हित जपण्यासाठी प्रयत्न करावेत, असे रोडे पाटील यांनी सांगितले. आसपासच्या काही सहकारी व खासगी साखर कारखान्यांकडून अधिक भाव देण्याचे आश्वासन देऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आकर्षित केले जाते. मात्र, काही ठिकाणी ऊस बिलांच्या थकबाकीच्या तक्रारी तसेच वजनातील काटामारीसारखे प्रकार घडल्याची उदाहरणे समोर येतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी केवळ अधिक भावाच्या आश्वासनाला भुलून निर्णय न घेता कारखान्याचा व्यवहार, ऊस बिलांच्या भुगतानाबाबतची विश्वासार्हता आणि शेतकऱ्यांच्या हिताला दिले जाणारे प्राधान्य यांचाही विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. नागवडे सहकारी साखर कारखान्याने आजपर्यंत ऊस उत्पादक सभासदांचे एक रुपयाचेही पेमेंट बुडविले नसल्याचा दावा करत, कारखान्याने सहकाराच्या माध्यमातून विश्वासार्हता निर्माण केली असल्याचे रोडे पाटील यांनी नमूद केले. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या सहकारी साखर कारखान्याला प्राधान्य देऊन त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे ते म्हणाले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा, त्यांचे आर्थिक हित जपले जावे आणि तालुक्यातील सहकारी साखर कारखानदारी टिकून राहावी, यासाठी शेतकरी व कारखाना व्यवस्थापन यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. आगामी गळीत हंगामात शेतकऱ्यांनी नागवडे कारखान्याला जास्तीत जास्त ऊस पुरवठा करून सहकार चळवळ बळकट करावी. तसेच चेअरमन राजेंद्रदादा नागवडे आणि संचालक मंडळाने केलेल्या कामाला शेतकऱ्यांनी सहकार्याच्या माध्यमातून पाठबळ द्यावे, असे आवाहन संतोष रोडे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

## अभियानात दुष्काळ निवारणासाठी गावागावांत जलसंधारणाची कामे हाती घ्या : मुख्यमंत्री

नाशिक : (स. गांवकरी)

ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.०पाण्याचा प्रत्येक थेंब साठविणे, तलावांतील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या कामांसाठी राज्य शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्यावतीने आयोजित 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान लोकप्रतिनिधींचा महाकुंभ', मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा, अभियान २०२६-२७ चा शुभारंभ तसेच 'सरपंच परिसंवाद – दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. नाशिक येथील यूथ फेस्टिव्हल मैदानावर आयोजित या कार्यक्रमास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि राज्यभरातील सरपंच उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

अभियानात सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थांचे त्यांनी अभिनंदन करून ते म्हणाले, गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अभियानामुळे गावांमध्ये रस्ते, स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही यंत्रणा, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे. पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींसह अंतिम १२ ग्रामपंचायतींना स्वतः भेट देऊन तेथील विकासकामांची पाहणी करणार असल्याचेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.



यंदा सुरुवातीला अतिवृष्टी आणि त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाने दुष्काळ असलेल्या तालुक्यात १२ प्रकारच्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. आगामी काळात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असून, शेतकऱ्यांना मदत देताना आवश्यकतेनुसार निकषांच्या पलीकडे जाऊन निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

दुष्काळी परिस्थितीत कोणताही नागरिक उपाशी राहणार नाही, याची काळजी शासन घेईल. पात्र शिधापत्रिकाधारकांना आवश्यक अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासह शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचविण्यात येतील. शेतकऱ्यांना मदत करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणे आणि संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी उभे राहणे ही शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात दुष्काळ निवारण आणि दुष्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. तलावांतील गाळ काढणे, जलसंधारणाची कामे करणे आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९